Literacy for a Billion

Movie: Shabas sunbai
Year: 1986

Song: Durge durgat bhari tujvin
Lyricist:

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी
अनाथनाथे अंबे करूणा विस्तारी
वारी वारी जन्म मरणातें वारी
हारी पडलो आता संकट निवारी
जय देवी जय देवी महिषासुर मथिनी
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी
जय देवी जय देवी

त्रिभुवनी भुवनी पाहतां तुज ऐसी नाही
चारी श्रमले परंतु न बोलवे कांही
साही विवाद करितां पडिले प्रवाही
ते तूं भक्तांलागी पावसी लवलाही
जय देवी जय देवी
जय देवी जय देवी महिषासुर मथिनी
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी
जय देवी जय देवी

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां
क्लेशांपासुनी सोडविं तोडी भवपाशा
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा
जय देवी जय देवी
जय देवी जय देवी महिषासुर मथिनी
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी
जय देवी जय देवी

जय देवी जय देवी महिषासुर मथिनी
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी
जय देवी जय देवी

घालिन लोटांगण वंदीन चरण
डोळ्यांनी पाहीन रूप तुझे
प्रेमे आलिंगीन आनंदे पूजिन
भावें ओवाळीन म्हणे नामा
त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बंधुच्श्र सखा त्वमेव
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देव देव
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा
बुध्दयात्मना वा प्रकृतिस्वभावात्
करोमि यज्ञत् सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयामि
अच्युतं केशवं रामनारायणं
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम्
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं
जानकीनायकं रामचंद्रं भजे
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*